# वीज उत्पादन खर्चात बचत करण्यास प्राधान्य - ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे

जळगाव, दि. २८ (वृत्तसंस्था) - वीज क्षेत्रातील वाढती स्पर्धा लक्षात घेता, महानिर्मितीचे संच सुरळीत सुरु राहिले पाहिजेत याकरिता कोळसा, तेल, पाणी व प्रशासकीय खर्चात बचत करुन स्वच्छ व स्वस्त दरात वीज उत्पादन करण्यास महाजेनकोचे प्राधान्य असेल असे प्रतिपादन राज्याचे ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज भुसावळ वीज केंद्र पाहणी प्रसंगी केले.

राज्यातील विजेची वाढती मागणी लक्षात घेता भुसावळ येथे नवीन प्रस्तावित ६६० मेगावॅट वीज प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव त्यातील तांत्रिक बाबींची पुर्तता होत असल्यास शासनाचे विचाराधीन असल्याचे सुतोवाच बावनकुळे यांनी पत्रकारांशी संवाद साधताना केले.

गेल्या महिनाभरात, कोराडी, खापरखेडा, नाशिक वीज केंद्रांची पाहणी केल्यानंतर ऊर्जामंत्री यांनी चवथा दौरा भुसावळ वीज केंद्राचा केला. महानिर्मितीच्या सर्व वीज केंद्रांच्या कामगिरीत सूक्ष्म नियोजनाव्दारे अंतर्गत सुधारणा राबवून वीजनिर्मिती दर कमी कसा करता येईल या उद्देशाने आपण प्रत्येक वीज केंद्राची पाहणी करत असल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले.

यावेळी रावेर लोकसभा मतदार संघाच्या खासदार रक्षा खडसे, आमदार हरिभाऊ जावळे, आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे, महानिर्मितीचे संचालक (संचलन) विजय सिंह, कार्यकारी संचालक (मानव संसाधन) मनोज रानडे, भुसावळ वीज केंद्राचे मुख्य अभियंता अभय हरणे, मुख्य अभियंता (स्थापत्य) ए. जी. देव-तारे, जिजोबा पारधी, मुख्य अभियंता महावितरण भाऊसाहेब राऊत मुख्य अभियंता महापारेषण, उप मुख्य अभियंता गिरिश कुमरवार माधव कोठुळे तसेच वरिष्ठ अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

बावनकुळे यांनी आज दीपनगर येथील भुसावळ वीज केंद्रातील५०० मेगावॅट वीज संचाची पाहणी केली. त्या प्रामुख्याने कोळसा हाताळणी विभाग, वॅगन टिपलर, राख हाताळणी विभाग, बॉयलर, अर्बाईन, जनरेटर, नियंत्रण कक्ष, अभिनव रेन वॉटर हार्वेस्टिंग, श वॉटर रिकव्हरी स्क्रीम, तसेच दीपनगर वसाहत परिसराची व्यक्तीशः बारकाई पाहणी केली. प्रारंभी भुसावळच्या माहिती पुस्तिकेचे मंत्रीमहोदयांचे हस्ते विमोचन करण्यात आले. प्रयास गुणवत्ता मंडळाने पाणी बचतीबाबत उत्कृष्ट सादरीकरण केले.

वरिष्ठ अधिकारी बैठकीत मंत्रीमहोदयांना संगणकीय सादरीकरणाव्दारे भुसावळ वीज केंद्राच्या अलिकडच्या गौरवास्पद कामगिरीविषयी मुख्य अभियंता अभय हरणे यांनी अवगत केले. सध्या महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाच्या निकषानुसार ग्राहक हितासाठी वीज दर हाच कळीचा मुद्दा असल्याने आगामी काळात वीजनिर्मिती खर्च अधिक आटोक्यात ठेवण्याची गरज आहे. हे वीज केंद्र मेरीट ऑर्डर डिस्पॅच ( एम. ओ. डी.) मध्ये राहील यासाठी येथील अधिकारी, अभियंते, तंत्रज्ञ, कामगार तथा कर्मचाऱ्यांनी अधिक कार्यक्षमतेने सूक्ष्म नियोजन करुन वीज दर कमी केल्यास महानिर्मितीचे संच अखंडीत सुरु राहतील, असे मत बावनकुळे यांनी व्यक्त केले.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस ह्याद्वारे कळविण्यात येते की, गांव मौजेः- शिवणसई, ता.वसई, जि. पालघर, येथील स.नं.७७, हि.नं.अ, क्षेत्र (हे. आर) ०-४२-०, पो.ख.०-०५-०, आकार ०.५२ (रु. पै) एकूण क्षेत्र ०-४७- ही जमीन मिळकत श्री. रमेश मधुकर किणी व इतर ४५ ह्यांच्या सामाईक मालकी व कब्जेवहिवाटीची असून सदरहू जमीन मिळकतीपैकी श्री. रमेश मधुकर किणी ह्यांच्या हिश्श्याची (०-०३-०) गुंठे जमीन मिळकत ही आमचे अशिलांना कायम विकत देण्याचे ठरविले आहे. तरी सदरचे जमीन मिळकतीवर कोणाही व्यक्ती वा संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, वहिवाट, शेअर, विक्री, गहाण, लीज, परवाना, बक्षीस, कब्जा, बोजा असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत योग्य त्या लेखी कागदोपत्री पुराव्यासहित खालील पत्त्यावर कळवावे, अन्यथा आपला काहीही हक्क नाही व तो असल्यास आपण सोडला आहे असे समजून व्यवहार पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
**ॲड.सौ. मनिषा प्रमोद पाटील (गावड)**
मो.नं. ९८९०७७१३७७
पत्ता : शॉप नं.८, नुतन विनायक अपार्टमेंट, चंदनसार, विरार (पूर्व). ता. वसई, जि. पालघर.

# कॉलसेंटरमध्ये गाड्या लावून देण्याचे आमिष दाखवून फसविले

**६ लाख रुपये किमतीच्या एक्सेंट कारचा अपहार**

नवी मुंबई, दि. २८ (वार्ताहर)- कॉर्पोरेट ऑफीसमध्ये अथवा कॉलसेंटरमध्ये भाडेतत्वावर गाड्या लावून देण्याचे आमिष दाखवून एका चौकडीने मुलुंडमध्ये राहणाऱ्या व्यक्तीच्या ६ लाख रुपये किंमतीच्या एक्सेंट कारचा अपहार केला आहे. रबाळे एमआयडीसी पोलिसांनी याप्रकरणातील चौकडी विरोधात फसवणुक तसेच अपहाराचा गुन्हा दाखल करुन त्यांचा शोध सुरु केला आहे.

या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आलेल्यामध्ये सचिन शिंदे, संदिप राय, संजय भोसले, आणि प्रदिप निंबाळकर या चौघांचा समावेश असून हे चौघेही विविध ठिकाणच्या कॉर्पोरेट ऑफीसेसमध्ये अथवा कॉलसेंटरमध्ये भाडेतत्वावर वाहने पुरविण्याचे काम करतात. यातील सचिन शिंदे याने दिघा येथील साठे नगरमध्ये आपले कार्यालय थाटून भाडेतत्वावर गाड्या पुरविण्याचा व्यवसाय सुरु केला होता. तर इतर तिघे मध्यस्थीने वाहने पुरविण्याचे काम करत होते. मुलुंड पश्चिम येथील वर्धमान नगरमध्ये राहणारे प्रविण ठक्कर यांना सचिन शिंदे भाडेतत्वावर वाहने भाड्याने लावून देत असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी गत मार्च महिन्यांमध्ये सचिन शिंदे याच्या दिघा येथील कार्यालयात जाऊन ६ लाख रुपये किंमतीची एक्सेंट कार भाडेतत्वावर देण्याची तयारी दर्शविली होती. त्यानुसार प्रविण ठक्कर व सचिन शिंदे यांच्यामध्ये प्रत्येक महिन्याला ४२ हजार रुपये भाडे देण्याचा व्यवहार ठरला होता.

या व्यवहारानंतर प्रविण ठक्कर यांनी आपली एक्सेंट कार सचिन शिंदेच्या ताब्यात दिल्यानंतर सचिनने सदरची कार संदिप रायकडे दिली. मात्र संदिप रायने संजय भोसलेकडे तर भोसलेने प्रदिप निबांळकरकडे सदरची कार चालविण्यासाठी दिली. दोन महिने उलटून गेल्यानंतर देखील सचिन शिंदेकडून वाहनाचे भाडे न मिळाल्याने त्यांनी वारंवार त्याच्याशी संपर्क साधला. मात्र सुरुवातीला त्याने वेगवेळी कारणे सांगुन वेळ मारुन नेली. त्यानंतर त्याने सदरचे वाहन इतर तिघांकडे दिल्याचे कबुल केले. त्यांच्याकडे वाहनाच्या भाड्याबाबत विचारणा करण्यात आल्यानंतर त्यांनी देखील आपले हात वर करण्यास सुरुवात केली. त्यामुळे प्रविण ठक्कर यांनी आपले वाहन परत देण्याची मागणी चौघांकडे केली. मात्र या चौघांनी ठक्कर यांना त्यांच्या वाहनाचे भाडे तसेच त्यांची कार परत केली नाही.

त्यामुळे ठक्कर यांनी रबाळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात याबाबतची तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवरुन सचिन शिंदेसह त्याचे इतर तीघे सहकारी संदिप राय, संजय भोसले व प्रदिप निंबाळकर या चौघांविरोधात फसवणुक तसेच अपहाराचा गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक कोडग यांनी दिली. या चौकडीने अशाच पद्धतीने अनेक व्यक्तींना फसविले असण्याची शक्यता कोडग यांनी व्यक्त केली.

## जाहीर नोटीस

आमचे अशील श्रीम. बानू इक्बाल शिकलगार, २) कु. इरफान रज्जाक शिकलगार रा. गिरधारी सिंग चाळ नं. २१७ अे, रूम नं.१, उंदराई रोड, राईपाडा, मालाड (प.), मुंबई-६४, यांनी दिलेल्या माहितीवरून व त्यांचे सांगणेवरून तमाम जनतेस जाहीर नोटीसने कळवित आहोत की,

आमचे अशील यांची गांव मौजे मालाड, मुंबई, रजियाबानू कंपाऊंड, नाडियाडवाला कॉलनी नं.२, एस.व्ही. रोड मालाड (प.), मुंबई-६४ याठिकाणी वडिलोपार्जित दुकान आहे.

आमचे अशील क्र.१ यांचे वडील व क्र.२ चे आजोबा कै. उमर राजू शिकलगार यांनी त्यांचे हयातीत सदर मिळकत आमचे अशील व अल्लाबक्ष उमर शिकलगार (अशील क्र.१ चा भाऊ व क्र.२ चा काका) यांना एकत्रितपणे चालविणेकरीता दिले होते.

आमचे अशिलांनी अल्लाबक्ष यांच्यावर विश्वास ठेवून दुकानाची देखभाल त्यांचेकडे दिली. मात्र अल्लाबक्ष यांनी त्याचा गैरफायदा घेऊन आमचे अशिलांना न विचारता सदर दुकानाचे दोन भाग करून एक भाग अब्दुल्ला पानवाला यांस, १८,००,०००/- (अठरा लाख रु.) या रक्कमेस विकला. त्याचा एकही पैसा आमच्या अशिलास दिला नाही. आता दुसरा भाग राज लक्ष्मी मेटल दुकान नं.१ हे दुकान परस्पर श्री. प्राणनाथ तिवारी, रा. नाडियाडवाला कॉलनी, मालाड (प.), मुंबई-६४ यांस विकणार असल्याचे समजले आहे. त्याकामी काही अनामत रक्कमही घेतली आहे.

तरी राज लक्ष्मी मेटल, दुकान क्र.१ ह्या दुकानाबाबत कोणाही इसमाने कोणत्याही प्रकारचा खरेदी विक्री व्यवहार आमचे अशिलांचा हक्क डावलून अल्लाबक्ष उमर शिकलगार यांचेशी केल्यास तो आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. आमचे अशील दुकानाचा कब्जा कोणासही देणार नाहीत याची तमाम जनतेने नोंद यावी.

आमचे अशील
१) बानू इकबाल शिकलगार
२) इरफान

**वकील**
**(ॲड. रमा एन. मातेरे)**
पत्ता : २०२, माता तुळजा भवानी बिल्डिंग, राजानगर, तुळींज, नालासोपारा (पू.) ता. वसई, जि. पालघर

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, माझे अशील मौजे उमेळमान, ता. वसई, जि. पालघर येथील सर्व्हे क्र. २०, हिस्सा क्र.१ अ (पैकी) क्षेत्र ३८३ चौ.मी. जागा व त्यावर असलेली इमारत श्री. अनिल नरहरी घरत व इतर तीन यांच्याकडून रिडेव्हलपमेंट करण्यासाठी घेण्याच्या विचारात आहे व त्याबाबत बोलणी चालू आहेत.

तरी त्याबाबत कुणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत ऑफिस क्र.२, पहिला माळा, शांती गंगा अपार्टमेंट, बी बिल्डिंग, भाईंदर (पूर्व), ता व जिल्हा ठाणे येथे लेखी कळवावे. दिलेल्या मुदतीत कळविण्यात न आल्यास कुणाचीही हरकत नाही असे समजून योग्य ती कार्यवाही करील याची नोंद घ्यावी.

**ॲड. जॉन एम. रॉड्रीक्स**

## नॅशनल स्टील ॲन्ड ॲग्रो इंडस्ट्रीज लिमिटेड

सीआयएन : एल२७१०० एमएच१९८५ पीएलसी१४०३७९
नोंद. कार्यालय : ६२१, तुलसियानी चेंबर्स, नरिमन पॉईंट, मुंबई (एमएच)
दूरध्वनी : ९१-०२२-२२८८६२६७, २२०२५०९८, फॅक्स : ९१-०२२-२२०२५०८४
प्रशासकीय कार्यालय : ४०१, महाकोश हाऊस, ७/५, साऊथ तुकोगंज, नाथ मंदिर रोड, इंदोर-४५२००१ (एम.पी.), दू. : + ९१-७३१-४०१७४०९, फॅक्स : +९१-७३१-२५१६७१४.
ईमेल : nsail_indore@nsail.com वेबसाईट : www.nsail.com

**३१ मार्च, २०१६ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षाकरिता लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांचा उतारा**

(रु. लाखांत इपीएस वगळून)

| तपशील | तिमाही समाप्ती | | वर्ष समाप्ती | |
|---|---|---|---|---|
| | ३१.३.२०१६ (लेखापरिक्षित) | ३१.३.२०१५ (लेखापरिक्षित) | ३१.३.२०१६ (लेखापरिक्षित) | ३१.३.२०१५ (लेखापरिक्षित) |
| परिचालनातून एकूण उत्पन्न (निव्वळ) | १,०२,०१३ | १,०३,१९० | ३,७५,०३१ | ३,८८,३८७ |
| करपश्चात सर्वसाधारण गतिविधीतून निव्वळ नफा/(तोटा) | २,२४१ | ६६९ | ३,०१३ | ३,०१५ |
| करपश्चात (अनन्यसाधारण बाबींपश्चात) कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) | १,७७७ | ४.१२ | २,५४९ | २,७५८ |
| समन्यायी भागभांडवल | ४,४५० | ४,४५० | ४,४५० | ४,४५० |
| राखीव (मागील वर्षाच्या ताळेबंदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राखीव वगळून मूल्यांकन) | - | - | २८,५५१ | २६,००२ |
| प्रती प्राप्ती शेअर (अनन्यसाधारण बाबींपूर्व) (प्रत्येकी रु. १०/-) | | | | |
| (ए) मूलभूत : | ४.४४ | ०.९३ | ६.१८ | ६.२० |
| (बी) सौम्यिकृत : | ४.४४ | ०.९३ | ६.१८ | ६.२० |
| प्रती प्राप्ती शेअर (अनन्यसाधारण बाबींपश्चात) (प्रत्येकी रु. १०/-) | | | | |
| (ए) मूलभूत : | ३.९९ | ०.९३ | ५.७३ | ६.२० |
| (बी) सौम्यिकृत : | ३.९९ | ०.९३ | ५.७३ | ६.२० |

टिप:- सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲन्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या नियमावली ३३ अन्वये तिमाही आणि वार्षिक वित्तीय निष्कर्ष त्यासह स्टॉक एक्सचेंजेसच्या आराखड्यांचा उतारा वर देण्यात आला आहे. तिमाही आणि वार्षिक वित्तीय निष्कर्षांचा संपूर्ण आराखडा स्टॉक एक्सचेंजेस वेबसाईट www.bseindia.com आणि www.nseindia.com आणि कंपनी वेबसाईट www.nsail.com येथे उपलब्ध आहे.

मंडळाच्या आदेशानुसार
सही/-
नागालिंगम गोली
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन: ०३३१७१३०

दिनांक: २७ मे, २०१६
स्थळ: इंदोर

## श्रीनाथ इन्व्हेस्टमेंट कंपनी लिमिटेड

सीआयएन - एल६७१२०एमएच१९७९पीएलसी०२२०३९
नोंद. कार्यालय: ८०१-८०२, दलामल टॉवर, नरिमन पॉईंट, मुंबई -४०००२१. दूर. क्र. ६६३८१८०० ईमेल आयडी: sicl2889@gmail.com

**मार्च ३१, २०१६ रोजी संपलेल्या तिमाही / नऊमाहीकरिता लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांचा उतारा**

(रु लाखांमध्ये)

| तपशील | तिमाही समाप्ती ३१.०३.२०१६ रोजीस लेखापरिक्षित | ३१.०३.२०१६ रोजी संपलेल्या वर्षाकरिता तारखेपासूनची आकडेवारी लेखापरिक्षित | ३१.०३.२०१५ रोजी संपलेली तिमाही समाप्ती लेखापरिक्षित |
|---|---|---|---|
| १. परिचालनातून एकूण उत्पन्न (निव्वळ) | - | - | - |
| २. करपश्चात सर्वसाधारण गतिविधीतून निव्वळ नफा / (तोटा) | १६.२८ | २७.६९ | (०.३१) |
| ३. करपश्चात कालावधीकरिता (अनन्यसाधारण बाबींनंतर) निव्वळ नफा/(तोटा) | १६.२८ | २७.६९ | (०.३१) |
| ४. समन्याय भाग भांडवल | २५.०० | २५.०० | २५.०० |
| ५. राखीव ( मागील वर्षाच्या ताळेबंदात नमूद केल्याप्रमाणे राखीव वगळून पुनर्मूल्यांकन) | ७४८.४८ | ७४८.४८ | ७४८.४८ |
| ६. प्रती प्राप्ती शेअर (अनन्यसाधारण बाबींपूर्व) (प्रत्येकी रु. १०/- दर्शनीमूल्य) | ६.५१ | ११.०८ | (०.१२) |
| (ए) मूलभूत : | ६.५१ | ११.०८ | (०.१२) |
| (बी) सौम्यीकृत : | | | |
| ७. प्रती प्राप्ती शेअर (अनन्यसाधारण बाबींपश्चात) (प्रत्येकी रु.१०/- दर्शनीमूल्य) | | | |
| (ए) मूलभूत : | ६.५१ | ११.०८ | (०.१२) |
| (बी) सौम्यीकृत : | ६.५१ | ११.०८ | (०.१२) |

**टीप :** सेबी (लिस्टिंग ॲन्ड ऑदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजेस मध्ये नमूद केल्याप्रमाणे तिमाही/नऊमाहीकरिता वित्तीय निष्कर्षाचा आराखड्याचा उतारा वर देण्यात आला आहे. तिमाही/नऊमाहीकरिताचा संपूर्ण वित्तीय निष्कर्षाचा आराखडा स्टॉक एक्सचेंजची वेबसाईट येथेही उपलब्ध आहे.

मंडळाच्या आदेशानुसार
श्रीनाथ इन्व्हेस्टमेंट कंपनी लिमिटेड करिता
सही/-
विकास मापारा
संचालक
डीआयएन : ००२११५८०

दिनांक : २७ मे, २०१६
ठिकाण : मुंबई

## मनविजय डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेड

सीआयएन : एल४५२०८एमएच१९८२पीएलसी२६४०४२, ईमेल : manvijaydcl@yahoo.com
नोंदणी कार्यालय : युनिट क्र. ५०९, स्टॅनफोर्ड प्लाझा, ओशिवरा, न्यू लिंक रोड, अंधेरी (प), मुंबई ४०००५६

**३१ मार्च २०१६ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षाकरिता अलिप्त लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षाचा उतारा**

| अ. क्र. | तपशील | संपलेली तिमाही ३१.०३.२०१६ | संपलेली तिमाही ३१.०३.२०१५ | संपलेले वर्ष ३१.०३.२०१६ |
|---|---|---|---|---|
| १. | प्रवर्तनातून एकूण उत्पन्न (निव्वळ) | २५.२ | (६.२) | ४४.२ |
| २. | कर, अल्प व्याज आणि सहयोगीच्या नफा/तोटयाचा हिस्सा पश्चात निव्वळ नफा/(तोटा) | ९.४० | (३३.६४) | ०.६४ |
| ३. | भरणा झालेले भागभांडवल (पूर्ण देय प्रत्येकी रु. १०/- चे दर्शनी मूल्य) | ६४८ | ३२४ | ६४८ |
| ४. | राखीव (मागील वर्षाच्या ताळेबंदात दर्शविल्यानुसार पुनर्मूल्यांकीत राखीव वगळून)* | १२.७८ | १२.१४ | १२.७८ |
| ५. | प्रती समभाग प्राप्ती (अनन्यसाधारण बाबींपूर्व) (प्रत्येकी रु. १०/- च्या) मूलभूत आणि सौम्यिकृत | ०.१५ | (१.०४) | ०.०१ |
| ६. | प्रती समभाग प्राप्ती (अनन्यसाधारण बाबीपश्चात) (प्रत्येकी रु. १०/- च्या) मूलभूत आणि सौम्यिकृत | ०.१५ | (१.०४) | ०.०१ |

टिपा :
१) सेबी (लिस्टिंग ॲण्ड अदर डिस्क्लोझर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजकडे सादर केलेल्या ३१ मार्च २०१६ रोजी संपलेली तिमाही आणि वर्षाकरिता वित्तीय निष्कर्षाच्या तपशिलवार विवरणाचा वरील एक उतारा आहे. ३१ मार्च २०१६ रोजी संपलेली तिमाही आणि वर्षाकरिता वित्तीय निष्कर्षाचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्सचेंजचे वेबसाईट (www.bseindia.com) आणि कंपनीची वेबसाईट (www.manvijay.com) वर उपलब्ध आहे.

मनविजय डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेड करिता
नितिन प्रधान
व्यवस्थापकीय संचालक (डीआयएन : ०१५९५५७६)

ठिकाण : मुंबई
दिनांक : २८ मे, २०१६

## मुंबई येथील न्यायाधिकारितेच्या उच्च न्यायालयात
## सर्वसाधारण मूळ दिवाणी न्यायाधिकरण
## निर्देश क्र. ३२९ सन २०१६ करिता कंपनी समन्स

कंपनी अधिनियम, १९५६ आणि कंपनी अधिनियम, २०१३ **च्या बाबींमध्ये.**

**आणि**

कंपनी अधिनियम, १९५६ च्या कलम ३९१ ते ३९४ सहवाचता कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम ५२ आणि कंपनी अधिनियम, १९५६ च्या कलम १०० ते १०३ (त्याची कोणतीही सांविधिक सुधारणा किंवा पुनर्जोडपत्र दुरुस्तीसह) **च्या बाबींमध्ये.**

**आणि**

हुहतामकी पीपीएल लिमिटेड (पूर्वी दि पेपर प्रोडक्टस् लिमिटेड अशी ज्ञात), कंपनी अधिनियम, १९१३ च्या तरतुदींन्वये प्रस्थापित कंपनी आणि जिचे नोंदणीकृत कार्यालय आहे युनिट क्र. १२ए-०६, १३ वा मजला, परिनी क्रिसेन्झो, प्लॉट क्र. सी-३८ आणि सी-३९, जी ब्लॉक, एमसीए मागे, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०००५१ येथे **च्या बाबींमध्ये.**

**आणि**

पॉझिटिव्ह पॅकेजिंग इंडस्ट्रीज लिमिटेड (**''हस्तांतरक कंपनी''**) सह हुहतामकी पीपीएल लिमिटेड (पूर्वी दि पेपर प्रोडक्टस् लिमिटेड अशी ज्ञात), (**''हस्तांतरिती कंपनी''** किंवा **''अर्जदार कंपनी''**) आणि त्यांचे संबंधित भागधारक आणि धनको यांच्या एकत्रिकरणाकरिता एकत्रिकरण योजनेच्या **बाबींमध्ये.**

हुहतामकी पीपीएल लिमिटेड (पूर्वी दि पेपर प्रोडक्टस् लिमिटेड अशी ज्ञात),
कंपनी अधिनियम, १९१३ च्या तरतुदींन्वये प्रस्थापित कंपनी आणि जिचे
नोंदणीकृत कार्यालय आहे युनिट क्र. १२ए-०६, १३ वा मजला,परिनी
क्रिसेन्झो, प्लॉट क्र. सी-३८ आणि सी-३९, जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला
कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०००५१ येथे. .... अर्जदार कंपनी

### समभागधारकांची सभा बोलाविणारी सभा

सूचना याद्वारे देण्यात येते की, निर्देशांकरिता वरील नमूद कंपनी समन्समध्ये दिनांक २२ एप्रिल, २०१६ रोजीच्या आदेशाद्वारे मुंबई येथील न्यायाधिकारितेच्या सन्माननीय उच्च न्यायालयाने निर्देश दिले आहेत की, पॉझिटिव्ह पॅकेजिंग इंडस्ट्रीज लिमिटेड (''हस्तांतरक कंपनी'') सह अर्जदार कंपनी आणि त्यांचे संबंधित भागधारक आणि धनको दरम्यान प्रस्तावित व्यवस्थेच्या योजनेमध्ये समाविष्ट व्यवस्था सुधारणेसह किंवा शिवाय विचारात आणि योग्य वाटल्यास मंजूर करण्यासाठी अर्जदार कंपनीच्या समभागधारकांची सभा बोलाविण्यात यावी.

सदर आदेश आणि त्यातील निर्देशांनुसार **पुढे सूचना** याद्वारे देण्यात येते की, अर्जदार कंपनीच्या समभागधारकांची सभा ही रामा ॲण्ड सुंद्री वाटुमल ऑडिटोरियम, के. सी. कॉलेज बिल्डिंग, विद्यासागर प्रिंसिपल के. एम. कुंदनानी चौक, १२४, दिनशॉ वाच्छा रोड, चर्चगेट, मुंबई-४०००२० येथे मंगळवार, २१ जून, २०१६ रोजी दु. ४.०० वा. घेण्यात येणार आहे.

योजनेची प्रत आणि कंपनी अधिनियम, १९५६ च्या कलम ३९३ अनुसार स्पष्टीकरणात्मक विवरणपत्र आणि प्रतिपत्री प्रपत्र आणि अटेन्डन्स स्लिप युनिट क्र. १२ए-०६, १३ वा मजला, परिनी क्रिसेन्झो, प्लॉट क्र. सी-३८ आणि सी-३९, जी ब्लॉक, एमसीए मागे, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०००५१ येथे स्थित अर्जदार कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयातून आणि किंवा अर्जदार कंपनीचे वकील, अटें: श्री. अनोज मेनन, देसाई ॲण्ड दिवाणजी, लेंटिन चेंबर्स, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई- ४००००१, महाराष्ट्र यांच्याकडून विनामूल्य प्राप्त करता येतील.

सभेला हजर राहून मतदान करण्यास हक्कदार असलेली व्यक्ती ही व्यक्तिश: किंवा प्रतिपत्री व्यक्तीद्वारे मतदान करू शकते की, त्याच्या प्राधिकृत प्रतिनिधीद्वारे किंवा वरील सदर सभेला हजर राहून मतदान करण्यास हक्कदार असलेल्या व्यक्तिद्वारे यथायोग्य सही केलेले विहित प्रपत्र/ प्राधिकारपत्र हे कंपनीज (कोर्ट) रुल्स, १९५९ च्या नियम ७० अन्वये पुरविल्यानुसार वरील सदर सभेपूर्वी किमान ४८ तास अगोदर युनिट क्र. १२ए-०६, १३ वा मजला, परिनी क्रिसेन्झो, प्लॉट क्र. सी-३८ आणि सी-३९, जी ब्लॉक, एमसीए मागे, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०००५१, महाराष्ट्र येथील अर्जदार कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात करणे आवश्यक आहे.

सन्माननीय उच्च न्यायालयाने सदर सभेचे अध्यक्ष म्हणून अर्जदार कंपनीचे अध्यक्ष श्री. सुरेश गुप्ता, ते नसल्यास अर्जदार कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. ए. वेंकटरंगन, ते नसल्यास अर्जदार कंपनीचे संचालक श्री. अरुणकुमार गांधी, ते नसल्यास अर्जदार कंपनीचे संचालक श्री. एस. के. पालेकर यांची नियुक्ती केली आहे. वरील नमूद योजना जरी सभेत मंजूर झाली तरी ती त्यानंतर मुंबई येथील सन्माननीय उच्च न्यायालयाच्या मंजुरीच्या अधीन राहील.

अर्जदार कंपनीने २० मे, २०१६ रोजीस डिपॉझिटरीजद्वारे पुरविल्यानुसार सभासद रजिस्टर/लाभकारींची सूचीमध्ये नावे असलेल्या अर्जदार कंपनीच्या सर्व सभासदांना प्रत्यक्ष प्रपत्र, स्पष्टिकरणात्मक विवरणपत्रासह सूचना पाठविण्याचे काम २८ मे, २०१६ रोजी पूर्ण केले आहे.

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १०८ सहवाचता कंपनीज (मॅनेजमेंट ॲण्ड ॲडमिनिस्ट्रेशन) रुल्स, २०१४ च्या तरतुदींच्या अनुपालनात आणि सिक्युरिटीज ॲण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोझर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या तरतुदींन्वये अर्जदार कंपनीने सभेच्या ठिकाणाच्या व्यतिरिक्त इतर ठिकाणाहून सेन्ट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस लिमिटेड (सीडीएसएल) च्या इलेक्ट्रॉनिक मतदान पध्दतीमार्फत (''ई-मतदान'') मतदान करण्याची सुविधा पुरविली आहे. सर्व सभासदांना कळविण्यात येते की:

१. सभेच्या सूचनेत नमूद केलेल्या विशेष व्यवसायाचा ई-मतदानाद्वारे व्यवहार करता येईल.
२. दूरस्थ ई-मतदान १७ जून, २०१६ रोजी स. ९ वा. सुरु होईल आणि २० जून, २०१६ रोजी सायं. ५.०० वा. (भाप्रवे) संपेल.
३. सदर कालावधीदरम्यान कट ऑफ तारीख म्हणजेच १४ जून, २०१६ रोजीस प्रत्यक्ष स्वरुपात किंवा डिमटेरिअलाइज्ड स्वरुपात समभाग धारण केलेले कंपनीचे भागधारक इलेक्ट्रॉनिकली त्यांचे मतदान करु शकतात.
४. कोणीही व्यक्ती ज्यांनी २० मे, २०१६ म्हणजेच सूचना पाठविण्याकरिता विचारात घेतलेल्या तारखेनंतर कंपनीचे समभाग संपादित केले आहेत आणि कंपनीचे सभासद बनले आहेत आणि कट ऑफ तारीख म्हणजेच १४ जून, २०१६ रोजीस समभाग धारण केलेले आहेत ते helpdesk.evoting@cdslindia.com किंवा (कंपनी/आरटीए इमेल आयडी) येथे विनंती पाठवून लॉगईन आयडी आणि पासवर्ड प्राप्त करु शकतात.
५. सभासदांनी नोंद घ्यावी की, i) ई-मतदान मॉड्युल वरील सदर तारीख आणि वेळेनंतर मतदानाकरिता सीडीएसएलद्वारे बंद करण्यात येईल आणि सभासदाने ठरावावर एकदा केलेल्या मतदानात त्यानंतर बदल करण्याची सभासदांना परवानगी देण्यात येणार नाही; ii) बॅलट पेपर मार्फत मतदानाची सुविधा सभेत उपलब्ध करण्यात येईल; iii) ज्या सभासदाने सभेपूर्वी दूरस्थ ई-मतदानाद्वारे त्यांचे मतदान केलेले आहे ते सुध्दा सभेला हजर राहू शकतात परंतू पुन्हा त्यांचे मतदान करण्यासाठी हक्कदार नाहीत; आणि iv) ज्या व्यक्तिंची नावे कट ऑफ तारखेस डिपॉझिटरीजकडे असलेले लाभकारी मालकांचे रजिस्टर किंवा सभासद रजिस्टरमध्ये नोंदविलेली असतील तेच फक्त सभेत मतदान तसेच दूरस्थ ई-मतदान सुविधा घेण्यास हक्कदार राहतील.
६. तुम्हाला ई-मतदानाशी संबंधित कोणतीही चौकशी किंवा माहिती हवी असल्यास तुम्ही फ्रिक्वेंटली आस्क्ड क्वेश्चन्स (एफएक्युज) चा संदर्भ घेऊ शकता आणि ई-मतदान मॅन्युअल ''हेल्प सेक्शन'' अंतर्गत www.evotingindia.com येथे उपलब्ध आहे किंवा helpdesk.evoting@cdslindia.com यांना ईमेल पाठवावा.
७. इलेक्ट्रॉनिक माध्यमाने मतदान सुविधेशी संबंधित तक्रार श्री. सुनिल शेलार, सिनियर असोसिएट मॅनेजर. टीएसआर दाराशॉ लि., ६-१०, हाजी मूसा पत्रावाला इंडस्ट्रियल इस्टेट, २०, डॉ. ई-मोझेस रोड, महालक्ष्मी, मुंबई- ४०००११, महाराष्ट्र, ईमेल: sshelar@tsrdarashaw.com, फोन क्र. ०२२ ६६५६८४८४ यांना कळवाव्यात.

सदर सूचना कंपनीची वेबसाईट www.pplpack.com वर सुध्दा उपलब्ध आहे.

ठिकाण : मुंबई
दिनांक : २८ मे, २०१६

सुरेश गुप्ता
सभेकरिता नियुक्त अध्यक्ष

## Shining Star Solutions & Services Pvt. Limited

B-408, Naman Midtown, Senapati Bapat Marg, Elphinstone Road, (West), Mumbai-400 013.

**CIN No. U74999MH2013PTC247941**

**Balance Sheet as at 31.03.16**

(Amount in Rs.)

| Particulars | Note | As at 31.03.2016 | As at 31.03.2015 |
|---|---|---|---|
| **I. EQUITY AND LIABILITIES** | | | |
| **(1) Shareholder's Funds** | | | |
| (a) Share Capital | A | 100,000 | 100,000 |
| (b) Reserves and Surplus | B | 197,053 | (3,945,925) |
| (c) Money received against share warrants | | _ | - |
| **(2) Share application money pending allotment** | | | |
| **(3) Non-Current Liabilities** | | | |
| (a) Long-term borrowings | C | 254,000,000 | 254,000,000 |
| (b) Deferred tax liabilities (Net) | D | - | 5,661 |
| (c) Other Long term liabilities | E | 334,597 | 203,900 |
| (d) Long term provisions | | - | - |
| **(4) Current Liabilities** | | | |
| (a) Short-term borrowings | | | |
| (b) Trade payables | | 283,278 | 312,998 |
| (c) Other current liabilities | F | 10,424,759 | 7,965,831 |
| (d) Short-term provisions | | | - |
| **TOTAL** | | **265,339,687** | **258,642,465** |
| **II. ASSETS** | | | |
| **(1) Non-current assets** | | | |
| (a) Fixed assets | | | |
| (i) Tangible assets | G | 22,006 | 39,329 |
| (ii) Intangible assets | | - | - |
| (iii) Capital work-in-progress | | - | - |
| (iv) Intangible assets under development | | - | - |
| (b) Non-current investments | H | 248,521,020 | 248,521,020 |
| (c) Deferred tax assets (net) | I | 99,295 | - |
| (d) Long term loans and advances | J | 6,258,653 | 4,687,135 |
| (e) Other non-current assets | | - | - |
| **(2) Current assets** | | | |
| (a) Current investments | | - | - |
| (b) Inventories | | - | - |
| (c) Trade receivables | K | 3,847,462 | 1,513,447 |
| (e) Cash and cash equivalents | L | 6,079,066 | 3,442,511 |
| (f) Short-term loans & advances | | - | - |
| (g) Other current assets | M | 512,185 | 439,023 |
| **Total** | | **265,339,687** | **258,642,465** |

Significant Accounting Policies and Notes Forming Part of the Accounts

For and on behalf of the Board
Sd/-
Managing Director

Date : 29.05.2016
Place : Mumbai

## श्री कल्याण होल्डिंग्ज लिमिटेड

सीआयएन: एल६७१२०एमएच१९९३पीएलसी०७०५२६
नोंदणीकृत कार्यालय: सप्तश्रृंगी अपार्टमेंट, फ्लॅट क्र. १, तळ मजला, प्लॉट क्र. २८२ ए आणि २८५, सरसोळे (जी.इ.एस.) सेक्टर-६, नेरूळ (प), नवी मुंबई, महाराष्ट्र-४००७०६
निगम कार्यालय: बी-१९, लाल बहादूर नगर पूर्व, केसर कोठीच्या मागे, जे.एल.एन. मार्ग, जयपूर-३०२०१७ (राजस्थान)
इमेल: shrikalyan25@hotmail.com वेबसाईट: www.shrikalyan.com

**३१ मार्च, २०१६ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षाकरिता लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांचा उतारा**

(रु. लाखात)

| अनु क्र. | तपशील | तिमाही समाप्ती ३१.०३.२०१६ (लेखापरिक्षित) | संलग्न तिमाही समाप्ती ३१.०३.२०१५ (लेखापरिक्षित) | वर्ष समाप्ती ३१.०३.२०१६ (लेखापरिक्षित) |
|---|---|---|---|---|
| १ | परिचालनातून एकूण उत्पन्न (निव्वळ) | १४७.९ | २६.७६ | ४५७.११ |
| २ | कर पश्चात सर्वसाधारण गतिविधीतून निव्वळ नफा/(तोटा) | ६.७१ | -१५.२३ | १६.११ |
| ३ | कर पश्चात कालावधीकरिता (अनन्यसाधारण बाबींनंतर) निव्वळ नफा/(तोटा) | ६.७१ | -१५.२३ | १६.११ |
| ४ | समन्याय भाग भांडवल | ९९७.४५ | ९९७.४५ | ९९७.४५ |
| ५ | राखीव (मागील वर्षाच्या ताळेबंदात नमूद केल्याप्रमाणे राखीव वगळून मूल्यांकन) | - | - | -३२०.१० |
| ६ | प्रती प्राप्ती शेअर (अनन्यसाधारण बाबींपूर्व) (प्रत्येकी रु. १०/-) | | | |
| | मूलभूत: | ०.०७ | -०.१५ | ०.१६ |
| | सौम्यीकृत: | ०.०७ | -०.१५ | ०.१६ |
| ७ | प्रती प्राप्ती शेअर (अनन्यसाधारण बाबींपश्चात) (प्रत्येकी रु. १०/-च्या) | | | |
| | मूलभूत: | ०.०७ | -०.१५ | ०.१६ |
| | सौम्यीकृत: | ०.०७ | -०.१५ | ०.१६ |

**टीप:**
सेबी (लिस्टिंग ॲन्ड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजेसमध्ये नमूद केल्याप्रमाणे तिमाही आणि वर्षाकरिता लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांच्या तपशिलांचा आराखड्याचा उतारा वर देण्यात आला आहे. तिमाही वर्षाकरिता वित्तीय निष्कर्षांचा संपूर्ण आराखडा कंपनी वेबसाईट www.shrikalyan.com आणि स्टॉक एक्सचेंज वेबसाईट www.bseindia.com येथे उपलब्ध आहे.

**स्थळ: जयपूर**
**दिनांक: २८.०५.२०१६**

श्री कल्याण होल्डिंग्ज लिमिटेड करिता
सही/-
राजेंद्र कुमार जैन
अध्यक्ष -सह- संपूर्ण वेळाकरिता संचालक
डीआयएन: ००१६८१५१